# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

*"Towards Global Technological Excellence"*

दु. क्र. (०७२१) २६६०३६०, २६६०८५०

संकेत स्थळ : www.gcoea.ac.in ई मेल : principal@gcoea.ac.in

महत्वाची सुचना

जा.क्र.शाअमअ/शिष्य/शि.वि./2023/ 3712

दि.15/09/2023

विषय : सत्र 2022-23 संस्थेतील सरव शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज व तृटीतील अर्ज सादर करण्याकरीता तसेच सत्र 2021-22 शिष्यवृत्ती अर्ज Re-apply करण्यासाठी **दि.25/09/2023** पर्यंत Mahadbt Portal वर मुदतवाढ मिळाल्याबाबत.

सत्र 2022-23 संस्थेतील सर्व शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना दि.25/09/2023 पर्यंत Mahadbt Portal वर शिष्यवृत्ती अर्ज व तृटीतील अर्ज सादर करण्यासाठी समाजकल्याण कार्यालयामार्फत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. ज्या पात्र विद्यार्थ्यांनी अद्यापर्यत शिष्यवृत्तीचा अर्ज सादर केलेला नाही. त्यांनी त्वरीत शिष्यवृत्तीचा अर्ज सादर करावा व सत्र 2021-22 मधील ज्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित असतील त्यांनी सुध्दा अर्ज सादर करावे.

काही विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती योजनेच्या अर्जा मध्ये तृटी असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या लॉगीनला दुरुस्तीकरीता परत पाठविण्यात आलेले आहेत(send back to applicant). सदर विद्यार्थ्यांना वारंवार कळविण्यात येवुन सुध्दा अद्यापपर्यंत शिष्यवृततीचे अर्ज तृटीची पूर्तता करुन सादर केलेले नाहीत. सदर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करण्याकरीता शेवटची संधी देण्यात येत आहे. तरी त्यांनी तात्काळ आवश्यक त्या दुरुस्तीसह शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन रित्या Mahadbt या पोर्टलवर सादर करावे. **जे विद्यार्थी दि.25/09/2023 पर्यंत शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करणार नाहीत, त्यांची शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही व त्या विद्यार्थ्यांना या महाविद्यालयाचे संपूर्ण शुल्क ( खुल्या प्रवर्गा प्रमाणे) भरावे लागेल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

तसेच विद्यार्थ्याने ऑनलाईन रित्या शिष्यवृत्तीचा अर्ज सादर न केल्यामुळे किंवा अयोग्य रितीने शिष्यवृत्तीचा अर्ज सादर केल्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासुन वंचित राहिल्यास, याकरीता महाविद्यालय किंवा प्रशासन जबाबदार राहणार नाही, याची विद्यार्थी तसेच पालकांनी नोंद घ्यावी.

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
अमरावती.

प्रत : 1. सुचना फलक, मुख्य इमारत, शा.अभि.महा., अमरावती.

2. विभाग प्रमुख- स्थापत्य, यंत्र, विद्युत, माहिती तंत्रज्ञान, संगणक, उपकरणीकरण, अणुविद्युत (यांनी तात्काळ आपल्या स्तरावरुन विद्यार्थ्यांना सुचित करावे.)

3. डाटा सेन्टर, यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.